# अनुक्रमांक -१

# जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथील संगणक साहित्य व इतर सामुग्रीचे वार्षीक देखभाल दुरुस्ती करारासाठी निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख २५ / १ / १० ला दुपारी २.०० वाजेपर्यत निविदा उघडण्याची तारीख २७ /०१ / १० ला दुपारी १२.०० वाजता

१. जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथील संगणकिकरणातील खालील प्रमाणे साहीत्य संगणक यंत्रे व इतर यंत्र सामुग्रीचा वाषीक देखभ्ाल दूरूस्ती करार (Annual Maintenance ontract ) करावयाचा आहे.

| अ.क्र. | यंत्र सामुग्री /साहित्याचे नांव | | संख्या | प्रति नग दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Non Comprehensive | Comprehensive |
| १. | Per Computer | (Monitor,CPU Keyboard, Mouse) | ५८ | | |
| २ | Printer | Dot Matrix Printer | १० | | |
| | | Laser Printer | २६ | | |

**यंत्र सामुग्री /साहित्य**

| अ.क्र. | यंत्र सामुग्री /साहित्याचा तपशिल | संख्या | प्रति नग दर |
|---|---|---|---|
| १ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर ८१५०) | १ | |
| २ | कारटेज रिफिल एच पी ८१५०) | १ | |
| ३ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर ११६० ) | १ | |
| ४ | कारटेज रिफिल एच पी ११६०) | १ | |
| ५ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर २१५०) | १ | |
| ६ | कारटेज रिफिल (एचपी लेझर २१५०) | १ | |
| ७ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर १०२२) | १ | |
| ८ | कारटेज रिफिल (एचपी लेझर १०२२) | १ | |
| ९ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर २३००) | १ | |
| १० | कारटेज रिफिल (एचपी लेझर २३००) | १ | |
| ११ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर १०२०) | १ | |
| १२ | कारटेज रिफिल (एचपी लेझर १०२०) | १ | |
| १३ | कारटेज प्रिंटर (एचपी लेझर १०१८) | १ | |
| १४ | कारटेज रिफिल (एचपी लेझर २३००) | १ | |
| १५ | कारटेज प्रिटर (एचपी लेझर १००८) | १ | |
| १६ | कारटेज रिफिल (एच पी लेझर १००८) | १ | |
| १७ | कारटेज सॅमसंग प्रिटर (एमएल २५७०) | १ | |
| १८ | कारटेज सॅमसंग रिफिल (एमएल २५७०) | १ | |
| १९ | कारटेज सॅमसंग प्रिटर (एमएल १६४०) | १ | |
| २० | कारटेज सॅमसंग रिफिल (एमएल १६४०) | १ | |
| २१ | कारटेज सॅमसंग प्रिटर (एमएल २८५०) | १ | |
| २२ | कारटेज सॅमसंग रिफिल (एमएल २८५०) | १ | |
| २३ | कारटेज सॅमसंग प्रिटर (एमएल १०७०) | १ | |
| २४ | कारटेज सॅमसंग रिफिल (एमएल १०७०) | १ | |
| २५ | कारटेज सॅमसंग प्रिटर एससीएक्स ४८२८ FN | १ | |
| २६ | कारटेज सॅमसंग रिफिल एससीएक्स ४८२८ FN | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | कारटेज सॅमसंग प्रिंटर एससीएक्स ६३४५ एन | १ | |
| २८ | कारटेज सॅमसंग रिफिल एससीएक्स ६३४५ एन | १ | |
| २९ | कारटेज कॅनॉन प्रिंटर (एलबीपी २९००) | १ | |
| ३० | कारटेज कॅनॉन रिफिल (एलबीपी २९००) | १ | |
| ३१ | कारटेज कॅनॉन प्रिंटर (एलबीपी ३०००) | १ | |
| ३२ | कारटेज कॅनॉन रिफिल (एलबीपी ३०००) | १ | |
| ३३ | कारटेज कॅनॉन प्रिंटर फॅक्स (एल १४०) | १ | |
| ३४ | कारटेज कॅनॉन फॅक्स रिफिल (एल१४०) | १ | |
| ३५ | EPSON LQ ११५० | १ | |
| ३६ | EPSON LQ १०७० | १ | |
| ३७ | EPSON LQ २०७० | १ | |
| ३८ | EPSON LQ २१७५ | १ | |
| ३९ | EPSON LQ ३०० | १ | |
| ४० | प्रिंटर रिबन डॉट मॅट्रीक्स प्रिंटर करीता | १ | |
| ४१ | सीडी १ वेळा वापर | १ | |
| ४२ | सीडी अनेक वेळा वापर | १ | |
| ४३ | पेन ड्राईव्ह १,२,४,६,८ GB | १ | |
| ४४ | ॲन्टी वायरस | १ | |
| ४५ | युपीएस | १ | |

२. विहित नमून्यातील आपली दर निविदा दिनांक १/२०१० ला दुपारी २.०० वाजेपर्यत निवासी उपजिल्हाधिकारी व ते उपलब्ध नसल्यास अधिक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथें स्विकारण्यात येईल, कोणत्याही कारणाने यानंतर प्राप्त झालेल्या निविदाचा विचार केल्या जाणार नाही. विहित नमून्यातील निविदाच स्विकारण्यात येईल, तसेच निविदा पाकिटावर ठळक अक्षरात जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त संगणकाकरीता असे स्पष्ट लिहावे.

३. निविदा मंजुर झाल्यास १५ दिवसाचा आत करारनामा करणेंबाबत रुपये २०/- चा कोर्ट स्टॅम्प तसेच याबाबतची सुरक्षा ठेव रक्कम रु. १५०००/- रक्कम मा. जिल्हाधिकारी वर्धा यांच्या नांवाने राष्ट्रीसकृत बॅंकेतुन काढलेला डिपॉझिट ॲट कॉल जमा करणे आवश्यक आहे. रक्कमेवर व्याज अनूज्ञेय राहणार नाही.

४. निविदाधारकास उपरोक्त परीच्छेद मधिल अनू.क्र. १ ते ८ अंतर्गत (AMC)वार्षिक देखभाल दूरुस्ती करारातील कोणत्याही एका बाबीकरीता निविदा सादर करता येणार नाही. निविदाधारकास निविदा सादर करतांना परीच्छेद मधिल अनू. क्र. १ ते ८ अंतर्गत सर्व बाबीकरीता सादर करणे बंधनकारक राहील.

५. परीच्छेद मधिल अनु.क्र. १ ते ८ संगणक यंत्रे, प्रिंटर, युपीएस, मॉडेम, स्कॅनर ओव्हर हेड प्राजेक्ट इ. (संगणक संबधित यंत्रे) जिल्हातील सर्व उपविभागीय कार्यालय आणि जिल्हाकार्यालयातील संगणक कक्ष व संबंधित शाखेत स्थापित (installed) करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित निविदाधारकांना सदर संगणक यंत्रे अथवा इतर यंत्र सामुग्रीची पाहणी करावयाची असल्यास त्यांना संबंधित स्थळी शासकिय कामाकाजाचे दिवशी ११.०० ते ५.०० पर्यंत पाहणी करता येईल.

६. प्राप्त झालेली निविदा दिनांक /०१/२०१० ला दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथे उघडण्यात येतील.निविदाधारकांना स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधिव्दारे त्यांची इच्छा असेल तर यावेळी उपस्थित राहता येईल.

७. निविदाधारकांना, निविदामध्ये दर्शविलेले दर(अनू.क्र.१ तं १६ वगळता) दिनांक /०१/२०१० पर्यंत देण्यात येणा-या AMC आदेशाकरीता बंधनकारक राहतील.

८. निविदाधारकांना उपरोक्त परीच्छेद मधील अनू.क्र. ९ ते २४ अंतर्गत प्रिंटर रिबन रिफील पॅक इत्यादी बाबी करीता दिलेले दर दिनांक ३१/०३/०९ पर्यंत देण्यात येणा-या पूरवठा आदेशाकरीता बंधनकारक राहतील. तसेच सदर बाबी अंतर्गत साहीत्य एकमूस्त खरेदी न करता आवश्यकते नूसार पुरवठा आदेश देण्यात येईल.

९. वरील परीच्छेद मधील अनू.क्र.१ ते २४ अंतर्गत दर्शविलेली संख्या अंदाजीत आहे.आवश्यकतेनुसार या संख्येत बदल करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांना आहे.

१०. निविदाधारकांनी परीच्छेद मधील अनू. क्र. ९ ते २४ अंतर्गत साहीत्यांचे तपशिलानूसार (मेकनुसार) दर नोंदविणे,तसेच तपशिलाप्रमाणे (मेकनूसार) दिलेल्या साहीत्याचाच त्यांना पूरवठा करणे बंधनकारक राहील व त्यांची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील.

११. निविदाधारकांना पूरवठा आदेश दिल्यापासुन ५ दिवसाचे आंत आदेशीत साहीत्य चांगल्या स्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे पूरवठा करणे बंधानकारक राहील. उपरोक्त अवधीत व चांगल्या स्थितीत साहीत्याचा पूरवठा न झाल्यास त्या निविदाधारकांची निविदा रथ करण्यात येईल व अनामत रक्कम/सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल, तसेच होणा-या नूकसानाबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. निविदाधारकांना पुरवठा केलेल्या साहीत्यांच्या रक्कमेचे भूगतान प्राप्त झालेल्या साहीत्याची पडताळणी केल्यानंतर व साहीत्य चांगल्यास्थितीत मिळाल्याची खाञी झाल्यानंतरच करण्यात येईल.

१३. निविदाधारकांना परीच्छेद मधील अनू.क्र. १ ते ८ अंतर्गत यंत्र सामुग्रीचा (ACM) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार सद्यस्थितीत आहे. त्याच अवस्थेत स्विकारणे बंधनकारक आहे. तसेच सदर यंत्र सामुग्रीत काही बिघाड अथवा दूरूस्ती करीता कोणताही अतिरीक्त मोबदला देण्यात येणार नाही.

१४. परीच्छेद मधील अनू.क्र. १ ते ८ अंतर्गत वार्षिक देखभाल दुरूस्ती करारास यंत्र सामुग्रीचे कोणत्याही भागात (PART) बिघाड झाल्यास त्याची निविदाधारक दूरुस्ती करून देण्यास बंधनकारक असून ही त्याची जबाबदारी राहील याला प्रामुख्याने संगणक यंत्राची हार्डडिक्स,प्रिंटरचे हेड,मॉनिटरची पिक्चर टयुब स्कॅनरचा कॅमेरा, यूपीएसची बॅटरी इ. सर्व प्रमुख पार्टचा समावेश राहील.

१५. तसेच (ACM) अंतर्गत यंत्राचे दुरुस्ती संबंधी काही सुटे भाग (Part) स्थानिक बाजार पेठेत उपलब्ध न झाल्यास अथवा काही अपरीहार्य कारणास्तव ते दुरूस्त होऊ न शकल्यास त्याऐवजी नविन संगणक यंत्र/सयंत्राचा पूरवठा करण्यास निविदाधारक बंधनकारक असून ही त्यांची जबाबदारी राहील.

१६. वार्षिक देखभाल दुरुस्ती कराराचा (ACM) कालावधी माहे, एप्रिल, ०९ ते ३१/०१/२०१० याप्रमाणे एक वर्षाचा राहील. तसेच सदर कालावधीत बदल करण्याचे पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१७. करार नामा केल्यांनतर कराराचा कालावधी पुर्ण होण्यापूर्वीच जर देखभाल व दुरूस्तीचे काम सोडण्यास आले तर जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त करण्यात येऊन इतर एजन्सीजकडुन पुढील कालावधीचे देखभाल व दुरुस्तीचे काम करुन घेण्यात येईल व याकरीता जो जादा खर्च येईल तो मुळ कंत्राटदाराकडुन जमीन महसुल थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल.

१८. ACM अंतर्गत यंत्र सामुग्रीची देखभाल व दुरुस्ती शक्यतोवर संबंधित स्थळीच करणे बंधनकारक आहे. काही अपरीहार्य कारणास्तव त्याच ठिकाणी दुरुस्ती कारणे शक्य नसल्यास यंत्र सामुग्री वर्कशॉप मध्ये नेण्याची गरज भासल्यास ने-आण करण्याची जबाबदारी निविदाधारकांनी असुन यास ते बंधनकारक राहतील. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला देय राहणार नाही.

१९. यंत्र सामुग्रीची ने-आण करण्यात काही बिघाड अथवा नुकसान झाल्यास त्यास निविदाधारक जबाबदार राहील व त्याची नुकसान भरपाई करुन देण्यास ते बंधनकारक राहतील.

२०. ACM अंतर्गत यंत्र सामुग्रीची दुरुस्ती करते वेळी यंत्रातील नादुरुस्त (Part) सुटे भागाऐवजी नविन सुटेभाग टाकण्यास आल्यास अशा स्थितीत जून्या सुटे भागाची मालकी निविदाधारकाची राहील.

२१. वार्षिक देखभाल व दुरूस्ती कराराची रक्कम एकमूस्त व आगाऊ अदा करण्यात येणार नाही. सदर रक्कम त्रैमासिक हप्त्याने,हप्ता संपल्यावर अदा करण्यात येईल व यास निविदाधारक बंधनकारक राहील.तसेच काही अपरीहार्य कारणास्तव विहित मुदतीत कराराची रक्कम अदा करण्यात विलंब झाल्यास त्यावर व्याज देय राहणार नाही.

२२. सशर्त निविदा (Contiyional tender) विचार केला जाणार नाही व स्विकारण्यात येणार नाही.

२३. कोणतेही कारण न देता निविदा व त्याला दर्शविलेले दर (अंशत: किंवा पुर्णत:) अमान्य किंवा मान्य करण्यास पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी वर्धा यांना आहे.

२४. वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (ACM) संबंधी या कार्यालयाचे इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

क) मशिन मध्ये बिघाड झाल्यास माहीती/तार मिळाल्यापासुन निविदाधारक २४ तासाचे आतउपस्थित होण्यास बंधनकारक राहील.अन्यथा माहीती/तार मिळाल्या नंतरच दूस-या दिवसापासुन प्रत्येक दिवसाला प्रति दिवस रुपये १००/-(र. शंभर) या दराने (Down Time) बंद मशिन मोजण्यात येईल तसेच यातुन शासकिय सुटटीचा दिवस वगळता येईल.

ख) बिघाड झालेल्या भागाची शक्यतो येथेच दुरुस्ती करावी लागेल. परंतु एसएमपीएस,मदरबोर्ड पिक्चर टयुब, प्रिटर हेड कॅमेरा इ. मध्ये बिघाड असल्याचे आढळुन आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाची परवानगीने ते दुरुस्ती करीता वर्कशापमण्ये नेण्यास हरकत राहनणार नाही.

ग) जी यंत्र सामुग्री वर्कशाप मध्ये दुरुस्मी करीता नेण्यात येईल, त्यांची नोंद संबंधित विभाग न चुकता करुन द्यावी व ही आपली जबाबदारी असुन सर्व संगणकामध्ये नविन Anit Virus Edition टाकणे आवश्यक राहील.

घ) यंत्र सामुग्रीचे देखभाल दुरुस्तीकरीता येणा-या आपल्या प्रतिनिधीकडे आपले कंपनीचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. अन्यथा मशिनला तपासणी करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

ड) किरकोळ दुरुस्ती असल्यास कॉल अटेंन्ड केल्यापासुन एक दिवसात दुरुस्ती करुन देण्यास निविदाधारक बंधनकारक राहील. अन्यथा त्यांनतर होणा-या विलंबास प्रति दिवस यंत्र रु. १००/- (रुपये शृंभरा) प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येईल,तसेच यातुन शासकिय सुटटीचे दिवस वगळण्यात येतील.

च) मोठया प्रमाणावरील दुरुस्ती असल्यास कॉल अटेंन्ड केल्यापासुन तीन दिवसाचे आंत (शासकिय सूटटीचे दिवस वगळता) दुरुस्ती करुन द्यावी लागेल, तसेच सदर दुरुस्ती विहित मुदतीत करुन देणे शक्य नसल्यास त्याऐवजी पर्यायी व्यवस्था करुन देण्यास निविदाधारक बंधनकारक राहील. अन्यथा त्यानंतर होणा-या विलंबास (शासकिय सुटटीचे दिवस वगळता) प्रति दिवस रु.१००/-(रु.शंभर) प्रमाणे (Down time) म्हणुन दंड आकारण्यात येईल.

छ) मशिनच्या देखभालीसाठी आपणाला प्रत्येक आठवळयात एक वेळ भेट द्यावी लागेल व भेटीचा अहवाल त्याच दिवशी संबंधितांकडे द्यावा लागेल,तसेच डिमांड भेट न दिल्यास प्रति भेट रु.१०० दंडाची आकारणी करण्यात येईल व यास ते बंधनकारक राहतील.
ज) साहित्य देते वेळी ज्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचे स्वाधीन करण्यात येईल त्यांचे देयकावर स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहिल किंवा या शाखेत नोद घेणे जरुर राहिल.

**सदर निविदा प्रपत्र (किंमत रुपये ५०/-) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा (जिल्हा नाझर ) येथे उपलब्ध राहील.**

दिनांक / /२०१० निविदाधारक/निविदाधारकांची स्वाक्षरी
व पुर्ण पत्ता

पृ. क्रमांक अका/सामान्य/कावि-६७७ /१०
कार्यालय जिल्हाधिकारी वर्धा.
दिनांक ११.१.२०१०.